**खूप/जास्त आणि कमी/थोडे**

**चित्र पाहण्याकरता येथे क्लिक करा - खूप/जास्त आणि कमी/थोडे**

**नोंदीत दिलेल्या पर्यायी शब्दांचा क्रम हा त्यांच्या एकूण सर्वेक्षणातील वारंवारितेनुसार दिलेला आहे याची नोंद घ्यावी.**

मराठी भाषेतील परिमाणवाचक किंवा संख्यावाचक विशेषणांमध्ये गणनावाचक, आवृत्तिवाचक, अनिश्चिततावाचक असे उपप्रकार आढळतात. ‘अधिकत्व’ आणि ‘न्यूनत्व’ या संकल्पनांकरता महाराष्ट्रात आढळून येणारे वैविध्य पुढीलप्रमाणे.

अधिकत्व दाखवण्यासाठी मराठीतील बोलींमध्ये पुढील शब्दवैविध्य दिसून येते. भरपूर, जास्त, खूप, लई, बरीच़, अनेक, भरमसाठ, असंख्य, मायंदाळ, मोप, पुष्कळ, चिक्कार, गयरा, गहिरे, गन, गंज, मुतला, मुकला, सावटा, भलता, गच्चीस, पक्की, जाम, फार, बहु, भल्ती, वार्यामाप, बक्कळ, अफाट, खंडीभर, अनंत, लगीत, मोक्कार, भक्कम, अधिक, अमाप, घोन इ. वरील शब्दांपैकी ‘भरपूर’, ‘जास्त’, ‘खूप’ हे शब्द सर्व जिल्ह्यांमध्ये कमी अधिक प्रमाणात आढळतात. ‘मोप’, ‘लई’ हे शब्द प्रामुख्याने कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग या भागात आढळतात. ‘गयरा’, ‘गहिरे’, ‘गन’, ‘गंज’, ‘मुतला’, ‘मुकला’, ‘सावटा’ हे शब्द प्रामुख्याने धुळे, नंदुरबार, नाशिक या जिल्ह्यांमध्ये सापडतात. पालघर, रायगड आणि ठाणे जिल्ह्यांत ‘पक्की’, ‘जाम’ आणि ‘फार’ हे शब्द प्रामुख्याने आढळतात. तर पुणे आणि अहमदनगरमध्ये ‘मोक्कार’ आणि सोलापूर, सातारा आणि सांगली जिल्ह्यांमध्ये ‘बक्कळ’ हा शब्द प्रामुख्याने आढळतो. (लातूर, बीड, नांदेड, वाशीम, परभणी, जालना, औरंगाबाद या जिल्ह्यांमध्ये सुद्धा ‘बक्कळ’ हा शब्द मिळाला आहे.) वर्धा, अमरावती आणि नागपूर जिल्ह्यांमध्ये ‘पुष्कळ’ आणि ‘लागित’ तर बुलढाणा जिल्ह्यामध्ये ‘भक्कम’ हा शब्द विशेषत्वाने दिसून येतो.

तसेच वेगवेगळ्या भौगोलिक प्रदेशांत ‘थोडे’, ‘कमी’, ‘नकाडं’, ‘वाइच’, ‘जरासे’, ‘जिराकूच’, ‘हालका’, ‘उल्या’, ‘मोजके’, ‘थुडकी’, ‘किरकोळ’, ‘शिरवा’, ‘होलीकशे’, ‘इत्तासा’, ‘किंचित’ इ. हे शब्द न्यूनत्वदर्शक आहेत.

यापैकी काही विशेषणे परिमाणवाचक तर काही गुणात्मक आहेत.

ह्या सामग्रीचे अधिकार क्रिएटिव्ह कॉमन्स संस्थेच्या श्रेयनिर्देशन-समवितरण ४.० ह्या परवान्याअंतर्गत मुक्त करण्यात येत आहेत.
परवान्याच्या मजकुरासाठी पुढील दुवा पाहता येईल. http://creativecommons.org/licenses/by-nc-sa/4.0/.